# मेट्रो-३च्या खालून जाणार भुयारी मार्ग

## ऑरेंज गेट ते मरिन ड्राइव्ह मार्गाच्या आराखड्यात बदल

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** पूर्वमुक्त मार्गाला पूरक अशा ऑरेंज गेट ते मरिन ड्राइव्ह भुयारी मार्गाच्या उभारणीत रेल्वेचा अडथळा होऊ नये, म्हणून त्यात बदल करण्यात आला आहे. मूळ आराखड्यानुसार हा मार्ग मध्य रेल्वेच्या इमारतीखालून जाणार होता. मात्र, नव्या आराखड्यानुसार हा मार्ग रेल्वे आणि अन्य इमारतींचा अडथळा टाळून मेट्रो-३च्या खालून जाणार आहे. पूर्वमुक्त मार्गावरून येणाऱ्या आणि नरिमन पॉइंट किंवा मरिन लाइन्सकडे जाणाऱ्या वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी हा भुयारी मार्ग बांधण्यात येणार आहे. त्यामुळे सीएसएमटी येथील पोस्ट ऑफिससमोर होणारी वाहतूककोंडी टाळणे शक्य होणार आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत या मार्गाकरिता नेमण्यात आलेल्या सल्लागाराच्या अहवालानंतर भुयारी मार्गाच्या आराखड्यात बदल करण्यात आला आहे. नव्या आराखड्यानुसार प्रकल्पाच्या डाव्या बाजूच्या भुयारी मार्गाची वळणाची त्रिज्या ही ३०० मीटरहून अधिक करण्यात आली आहे. त्यामुळे वाहनांचा वेग ५० किलोमीटर प्रति तास शक्य आहे. तसेच प्रस्तावित मार्गाच्या डावीकडील भुयारी मार्गाची सागरी किनारा मार्गास जुळणी करण्याऐवजी त्या खालून पुढे दक्षिण दिशेला नेण्याचे प्रस्तावित आहे. त्यामुळे सागरी किनारा मार्गाला होणारी जुळणी टाळता येणे शक्य होऊन हा मार्ग सुरक्षित झाला आहे.

### ४० मीटर खोल

- **सुरक्षिततेच्या दृष्टीने मध्य रेल्वे आणि अन्य उंच इमारतींना धोका पोहोचू नये, म्हणून प्रस्तावित भुयारी मार्ग मेट्रो-३च्याही खालून नेण्याचे ठरले आहे.**
- मेट्रो-३ हा भुयारी मार्ग आहे. त्याही खालून नवा प्रस्तावित मार्ग नेण्याची योजना आहे. थोडक्यात हा भुयारी मार्ग जमिनीखालून सुमारे ४० मीटरपेक्षा जास्त खोलीवरुन जाणार आहे.



### खर्चही वाढला

या मार्गाची लांबीही वाढविण्यात आली आहे. यामुळे या प्रकल्पाकरिता सुरुवातीला वर्तवण्यात आलेला ८,०५६ कोटी रुपये खर्च वाढून ८,७४२ कोटींवर गेला आहे.

### लांबी वाढली

- **या शिवाय प्रकल्पाच्या डावीकडील बाजूचा भुयारी मार्ग सागरी मार्गाच्या खालून नेऊन पुढे मरीन ड्राइव्ह येथील बी.डी. सोमानी चौकाच्या दक्षिणेस भूपृष्ठावर आणण्यात येणार आहे.**
- भुयारी मार्गाची लांबी ८२५१ मीटर ऐवजी ९२३९ मीटर इतकी झाली असून, त्यामुळे सुमारे ९८८ मीटर लांबीची वाढ झाली आहे. यामुळे हा मार्ग तब्बल ९.२३ किलोमीटर इतका झाला आहे.

### वेळ वाढला

प्रकल्पाच्या मूळ आराखड्यात बदल करण्यात आल्याने आधीच्या ४८ महिन्यांऐवजी तो ५४ महिन्यात पूर्ण करणे बंधनकारक असेल. यासाठीचे कंत्राट लार्सन ॲण्ड टुब्रो कंपनीला देण्यात आले आहे.